| | |
|---|---|
| MHNS230029282025 | **कौ.हिं.म.सं.अर्ज क्र. ४१/२०२५**<br>**वैशाली गाढवे वि.प्रकाश गाढवे व इतर** |

## निशाणी क्र.५ वरील आदेश

(पारीत दिनांक २९ जानेवारी २०२६)

सदरचा अर्ज हा अंतरिम दिलासे मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**१.** प्रस्तूत अर्जाद्वारे अर्जदार क्र. १ असे कथन करते की, तिचे लग्न गैरअर्जदारासोबत दि. २७/०२/२०१६ रोजी हिंदु धर्माच्या व समाजाच्या चालीरीतीरीवाजाप्रमाणे मौजे गोंदेदुमाला, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे झाला असुन लग्नाचा संपूर्ण खर्च हा अर्जदार क्र.१ चे आई वडिलांनी केलेला आहे. तसेच लग्नामध्ये तिच्या आईवडिलांनी संसारउपयोगी साहित्य देवून थाटामाटात लग्न केले. लग्न झाल्यानंतर ती गैरअर्जदारांच्या एकत्र कुटुंबात नांदायला गेली. गैरअर्जदार क्र. १ हे मामाच्या मुलीशी सतत फोनवर बोलत असे व तिला म्हणत असे की, तु रंगाने काळी आहेस, मला आवडत नाही. तसेच तिच्या दोन्ही ननंदा तिला काळ्या रंगावरून टोचून बोलत असत व जावुबाई व सासु सासरे तिचा मानसिक छळ करत असत. तसेच गैरअर्जदार हे तिच्याकडे पगाराची मागणी करत असत व त्याच पगारातून त्यांनी जमीन विकत घेवून तिची लेव्हलिंग केली. ती पुढे असे कथन करते की, ती वनखात्यात नोकरी करून घरातील सर्व काम करत असे व संपूर्ण पगार हा गैरअर्जदार क्र. १ याच्या हातात देत असे. केवळ नोकरी आहे व पगार मिळेल या हेतूने गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारासोबत लग्न केले. ती पुढे असे कथन करते की, ती गैरअर्जदार क्र.१ सोबत भाड्याने मौजे टाकेद येथे व त्यानंतर साकुरफाटा येथे राहिले परंतू गैरअर्जदार क्र.१ हा तिला एकटीला सोडून आईवडिलांकडे राहायचा व तिला मानसिक त्रास देत असे. ती पुढे असे कथन करते की, तिला मुलगी होवून देखील गैरअर्जदारांच्या वागणूकीत फरकत पडला नाही व सर्व गैरअर्जदार लग्नामध्ये आमची हौसमौस झाली नाही असे म्हणून तिचा शारिरिक व मानसिक छळ करत असत व गाडी घेण्यासाठी बापाकडून पाच लाख रूपये घेवून अशी मागणी करत असत. ती पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ हा माहेरी येवून अर्जदाराच्या घरच्यांना शिवीगाळ करत असे.त्यामुळे नाईलाजापोटी तिने पोलीस स्टेशनला अदखलपात्र तक्रार नोंदविली. ती पुढे असे कथन करते की,गैरअर्जदार मारहाण करून माहेरी हाकलून देत असत व त्यामुळे काही चुक

नसतांना माहेरी राहावे लागत आहे. ती पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ याचा केवळ तिच्या पगारावर डोळा असून अर्जदार हिला तिच्या मुलीसह माहेरी लाजीरवाणे जीवन जगावे लागत आहे. याउलट गैरअर्जदार क्र. १ हा मोठा शेतकरी असून त्यास वार्षिक २० लाख इतके उत्पन्न मिळते. तसेच त्याचे एस.एम.बी.टी. येथे गाळे असून त्यातून दरमहा २५,०००/– इतके भाडे येते शिवाय तो एस.एम.बी.टी. येथे नोकरीस असून त्यास दरमहा २५,०००/– इतका पगार मिळतो. परंतू तरी देखील तो अर्जदारांची हेळसांड करत आहे त्यामुळे ती गैरअर्जदार क्र. १ पासून दरमहा २०,०००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल केल्यापासून ते प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत मिळण्याची प्रार्थना करते.

२. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार याने त्याचे लेखी म्हणणे **नि.क्र.१४** वर सादर केले व अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, सदरहू अर्ज हा बिनबूडाचा असून त्यातील संपूर्ण मजकूर हा खोटा आहे. तो पूढे असे कथन करतो की, तो अर्जदार क्र. १ व २ यांना पुर्वी देखील व आज देखील सांभाळण्यास तयार होता व आहे. अर्जदार क्र. १ हिने स्त:हून त्याचा त्याग करून मुलीसह माहेरी निघून गेली. अर्जदार ही वन खात्यामध्ये कायमस्वरूपी नोकरीला असून तिला ६० ते ६५ हजाराच्या वर पगार मिळतो तसेच तिची माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. तो पूढे असे कथन करतो की, तो मिळेल ते कामधंदा करून कसेबसे कुटुंबाचा चरितार्थ चालवितो व अर्जदाराने मागितलेली खावटी देण्याची त्याची आर्थिक ऐपत नाही. त्यामुळे तो सदरहू अर्ज रद्द करण्याची प्रार्थना करतो.

३. दोन्ही पक्षांच्या कथनांचा विचार करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे ? | होय |
| २ | अर्जदार सिध्द करते काय, की, ती अर्जात मागितलेल्या सर्व मागण्या मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होय |
| ३ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

<u>**मुद्दा क्र.१ ते ३ करीता:**</u>

४. अर्जाचे, गैरअर्जदाराच्या म्हणण्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही पक्षांचा विधिज्ञांमार्फत यूक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या अर्जाचे, नि.क्र.३ वरील पोलीस तक्रार एन.सी.आर.क्र. ५००/२०२४ व अभिलेखावर सादर केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले असता प्रथमसकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ हीला गैरअर्जदाराने त्यागल्यानंतर ती तिच्या मुलीसह हलाखीचे जीवन जगत आहे. ज्याकरीता गैरअर्जदार यांच्या माध्यमातून होणारा कौटूंबिक छळ कारणीभूत आहे व अर्जदार ही गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे त्यामुळे मी **मूद्दा क्र.१ चे उत्तर होय** असे नोंदविले. संपूर्ण अभिलेखाचे व गैरअर्जदाराच्या **नि.क्र.१५** वरील मालमत्ता व दायित्व यांच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार हा शेती व नोकरीच्या माध्यमातून महिण्याकाठी पूरेसे उत्पन्न मिळवतो त्यामुळे अर्जदाराचे व तिच्या मुलीचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदाराची असल्याने व गैरअर्जदार ज्या जीवनशैलीत जगतो त्या जीवनशैलीत जगण्याचा अधिकार हा अर्जदारांचा देखील असल्याने ती गैरअर्जदार याच्या जीवनस्तराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे. परंतू या स्तरावर सबळ पुराव्याअभावी अर्जदाराने मागणी केलेली संपूर्ण अंतरिम खावटीची पुर्ण रक्कम मंजूर करणे अशा परिस्थितीत योग्य होणार नाही. त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदारापासून निश्चित काही रक्कम अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब, दोन्ही पक्षांच्या जीवनस्तराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मंजूर करणे योग्य होईल. वरील सर्व कारणांमुळे मी **मूद्दा क्र.२ चे उत्तर अंशत: होय** म्हणून नोंदवून **मूद्दा क्र.३** च्या उत्तरादाखल पूढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराचा प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कौटूंबिक छळ करू नये.

३. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारांना अंतरिम पोटगी म्हणून एकत्रित रक्कम रू.५,०००/– दरमहा अर्ज दाखल करण्याच्या तारखेपासून प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

RAJKIRAN UTTAMRAO INGLE

Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2026.01.29 16:27:27 +0530

**(आर. यु. इंगळे)**

**दिनांकः** २९/०१/२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),**
**इगतपुरी**

**आदेशाची प्रत विनामूल्य प्राप्त झाली.**

___________________
अर्जदार

___________________
गैरअर्जदार

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर निवेदन करते की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस.आर.भापकर
न्यायालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
पी.डी.एफ.दिनांक :- २९/०१/२०२६

स्वा/-
लघुलेखक